**किरकोळ अर्ज क्र.३४२/२०२५ मधील**
**निशाणी १ वरील आदेश**
(पारीत दिनांक १५.०४.२०२६)

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदाचे भाग २ प्रमाणे मयताचे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केला आहे.

०२) अर्जदार **एंजल अजय वानखडे** ही अज्ञान असल्याने प्रस्तुतचा अर्ज तिचे पालनकर्ता मामा नामे **रोशन वामनराव मोहोड** रा. जनुना, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती यांच्यामार्फत दाखल केला आहे.

०३) अर्जदाराच्या कथनानुसार, मयत **संध्या अजय वानखडे,** नव्हारा फाटा, सदरवाडी, ता. शिरपूर, पुणे, नांदगाव खंडेश्वर, अमरावती येथील रहिवाशी होत्या. मयत **संध्या अजय वानखडे** यांचा दिनांक ०७.१२.२०२३ रोजी, नांदगाव खंडेश्वर, अमरावती येथे मृत्यु झाला. मयत **संध्या अजय वानखडे** यांचे पती नामे **अजय देविदास वानखडे** यांचा दिनांक २१.१२.२०११ रोजी, नांदगाव खंडेश्वर, अमरावती येथे मृत्यु झाला. मयत **संध्या अजय वानखडे** यांचे अर्जदार ही मुलगी आहे. त्यामुळे मयत **संध्या अजय वानखडे** यांना अर्जदार शिवाय दुसरे कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस दाखला आवश्यकता असल्यामुळे अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.

०४) अर्जदाराच्या कथनानुसार,अर्जदाराचे आई मयत **संध्या अजय वानखडे** आणि वडील नामे **अजय देविदास वानखडे** यांचा दोघांचाही मृत्यु झाल्यानंतर अर्जदार यांचे मामा नामे रोशन वामण मोहोड हे तिचे पालनकर्ता आहे.

०५) अर्जदाराच्या अर्जाच्या अनुषंगाने कोणाचा आक्षेप असल्यासंदर्भात *''दैनिक जनमाध्यम''* नि. क्र.२२ अन्वये वर्तमानपत्रात प्रगटन देण्यात आले.

०६) अर्जदाराने त्याच्या कथनाच्या पृष्ठार्थ एकुण दोन साक्षीदार तपासले.

| | | |
|---|---|---|
| सा.क्र.१ | रोशन वामणराव मोहोड (अर्जदाराचे अ.पा.क.) | नि.क्र.१३ |
| सा.क्र.२ | गोपाल श्रीधर शिंदे | नि.क्र. १४ |

अर्जदाराने त्याचा मौखीक साक्ष पुरावा पुरशिस नि.क्र.२३ प्रमाणे बंद केला.

०७) अर्जदाराने खालील कागदपत्रांचा आधार घेतला.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदारांचा अधिकृत पत्ता | नि.क्र. ०३ |
| २ | **संध्या अजय वानखडे,** यांचे मृत्यू प्रमाणपत्र | नि.क्र. १८ |
| ३ | **अजय देविदास वानखडे,** यांचे मृत्यू प्रमाणपत्र | नि.क्र. १९ |
| ४ | अर्जदाराचे आधारकार्डाची प्रत | नि. क्र.२० |
| ५ | मयत **संध्या अजय वानखडे यांच्या** आधारकार्डाची प्रत | नि. क्र.४ सोबत |
| ६ | रोशन वामणराव मोहोड (अर्जदाराचे अ.पा.क.) यांच्या आधारकार्डाची प्रत | नि. क्र.२१ |
| ७ | दैनिक जनमाध्यम दि. १३.०१.२०२६ | नि.क्र.२२ |

०८) अर्जदारांचा सा.क्र. १ व २ चे पुराव्यावरून व मृत्यू दाखल्यावरून मयत **संध्या अजय वानखडे** यांचा दिनांक ०७.१२.२०२३ रोजी आणि मयत **अजय देविदास वानखडे** यांचा दिनांक २१.१२.२०११ रोजी झाल्याचे त्यांच्या साक्ष पुराव्यावरुन आढळुन येते.अर्जदारांचा सा.क्र. १ व २ चे पुराव्यावरून व अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रा वरुन मयत **संध्या अजय वानखडे हया** मौजे जुनुना ता. नांदगाव खंडेश्वर येथे रहिवाशी होत्या असे आढळुन येते.

०९) अर्जदारांचा सा.क्र. १ व २ चे साक्ष पुराव्यावरुन असे आढळुन येते की, अर्जदार ही **मयत संजय अजय वानखडे** यांची मुलगी आहे. त्यामुळे अर्जदार ही मयताची एकमेव वारस आहे असे स्पष्ट होते. तसेच त्यांच्या साक्ष पुराव्यावरुन मयतास अर्जदार यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस असल्याचे आढळून येत नाही.

१०) महत्वाचे म्हणजे प्रस्तुत प्रकरणात*'दैनिक जनमाध्यम ''* नि.क्र. २२ वर्तमानपत्रात दिनांक १३.०१.२०२६ रोजी जाहीर नोटीस संबंधीत दैनिक पत्रात देण्यात आली आहे. परंतु त्यानंतरही विहीत मुदतीत कोणीही अर्जदाराच्या अर्जाला आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे.

११) एकंदरीत अर्जदाराने दाखल केलेले सा.क्र. १ व २ चे पुरावे, कागदपत्रे व शपथपत्र पाहता अर्जदार ही मयत **संध्या अजय वानखडे** यांचे वारस आहे, असे दिसून येते. त्यामुळे ते बॉम्बे

रेग्युलेशन कायदा भाग २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**– आ दे श –**

०१) अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२) बॉम्बे रेग्युलेशन कायद्याचे तरतुदीप्रमाणे अर्जदार यांचे नावे मयत **संध्या अजय वानखडे** यांचे वारस प्रमाणपत्र द्यावे.

०३) अर्जदाराने कायद्यानुसार आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क अदा करावे.

०४) अर्जदाराने दिवाणी नियमावलीचे परिच्छेद ३१२ प्रमाणे पुर्तता करावी व संबंधित परिच्छेद ३१२ प्रमाणपत्रा सोबत जोडावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AMBHORE SHANKAR BABURAO
Date: 2026.04.15 16:02:20 +0530

**(एस. बी. अंभोरे)**

दिनांक : १५.०४.२०२६ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर

# Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Jr. Clerk | : | R.B. Khandhar |
| Court Name | : | Court of C.J.J.D.,Nandgaon Kh. |
| Date | : | 15/04/2026 |
| Order signed by<br>the Presiding Officer on | : | 15/04/2026 |
| Order uploaded on | : | 15/04/2026 |

XXXX